आपल्या प्रिय व्यक्तिला सर्वच व्यसनांपासुन मुक्त करा व आपले कुटुंब विस्कटण्या पासुन वाचवा...
गॅरंटीने सर्व व्यसन
दारु सोडवा
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
अपॉईंटमेंट 9552619752

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

शूरवीर जवान !... दुश्मनोंकी जान लेते है !!...
बेवकुफ व्यसनाधीन !... अपनोंकी जान लेते है !!...
गॅरंटीने सर्व व्यसन
दारु सोडवा
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
अपॉईंटमेंट 9552619752

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २१४ । शुक्रवार, दि.१५ ऑगस्ट २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

श्रीकृष्ण जयंती!



## देशदूत सुटीची सूचना

शुक्रवार, दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त 'देशदूत' कार्यालयाला सुटी असल्याने शनिवार, दि.१६ ऑगस्ट२०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. - संपादक

# किश्तवाडला ढगफुटी

## ३८ नागरिकांसह २ जवानांचा मृत्यू, १२० गंभीर जखमी तर २२० बेपत्ता

**श्रीनगर ।** जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील पड्डुर उपविभागात दि. १४ ऑगस्ट रोजी ढगफुटी झाली आहे. पड्डुरच्या चिशोती गावातील मचैल माता मंदिर परिसरात ढगफुटीची घटना घडली. किश्तवाडमधील ढगफुटी आणि पुरामध्ये ३८ जणांचा मृत्यू झाला असून २२० जण बेपत्ता तर १२० जण गंभीर जखमी आहेत. तिथे धार्मिक यात्रेसाठी भाविक जमले होते. ढगफुटीनंतर परिसरात पूर परिस्थिती निर्माण झाली. यानंतर बचावकार्य सुरु करण्यात आले. या सोबतच काश्मीरच्या राजौरी आणि मेंढरमध्ये ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत.

धार्मिक यात्रेसाठी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झालेली असताना ढगफुटी झाली. यावेळी परिसरात भाविकांनी मुक्कामासाठी तंबू ठोकले होते. ढगफुटी झालेल्या भागात बचाव कार्य करण्यात बऱ्याच अडचणी येत आहेत. या गावातील लोकसंख्या जास्त आहे.



### बचावकार्य सुरु-मोदी

जम्मू आणि काश्मीरमधील किश्तवाड येथे ढगफुटी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सर्व नागरिकांसाठी देश प्रार्थना करीत आहेत. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. मदतकार्य सुरू आहे. गरजूंना सर्वतोपरी मदत केली जाईल.

ढगफुटीनंतर आलेल्या पुरात निम्म्याहून अधिक गाव वाहून गेले आहे. रस्ते उद्ध्वस्त झाले आहे. त्यामुळे बचाव कार्य करणाऱ्या पथकाला ढगफुटी झालेल्या परिसरात पोहोचताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ढगफुटीमुळे आलेल्या पुरामुळे हजारो प्रवासी भाविक अडकल्याची भीती आहे. आसपास तैनात असलेल्या डेल्टा फोर्सेसच्या तुकड्या मदत कार्यात सहभागी झाल्या आहेत. एनडीआरएफ, एसडीआरएफची पथके आणि हेलिकॉप्टर लवकरच दुर्घटनास्थळी पोहोचतील. नुकसानाचा आढावा घेण्यासाठी आणि बचाव कार्यात समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरु आहेत. दुर्घटनेची माहिती मिळताच मोदी सरकारमधील मंत्री जितेंद्र सिंह यांनी स्थानिक अधिकाऱ्यांशी संवाद साधला आणि सद्य:स्थितीची माहिती घेतली. प्रशासनाने घटनास्थळी मदतकार्य सुरु केले आहे.

# ऑपरेशन सिंदूरच्या योद्ध्यांना शौर्य पुरस्कार जाहीर



**नवी दिल्ली ।** ऑपरेशन सिंदूरमध्ये शौर्य दाखवणाऱ्या भारतीय सुरक्षा दलातील शूर सैनिकांना सरकारकडून आज दि. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. मुरीदके आणि बहावलपूर येथील दहशतवादी गटाच्या मुख्यालयावर आणि पाकिस्तानी लष्करी मालमत्तेवर हल्ला करणाऱ्या लढाऊ वैमानिकांसह ९ भारतीय हवाई दलाच्या अधिकाऱ्यांना सरकार वीर चक्र, युद्धकाळातील तिसरा सर्वोच्च शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ऑपरेशन सिंदूरसाठी भारतीय वायुसेनेचे उपप्रमुख एअर मार्शल नरनंदेश्वर तिवारी, वेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल जितेंद्र मिश्रा आणि डीजी एअर ऑपरेशन्स एअर मार्शल अवधेश भारती यांच्यासह ४ भारतीय वायुसेना अधिकाऱ्यांना सर्वोत्तम युद्ध सेवा पदक प्रदान केले जाईल.

### वीर चक्राचे मानकरी

१) कॅप्टन रणजित सिंग सिधू २) कॅप्टन मनीष अरोरा ३) कॅप्टन अनिमेश पाटणी ४) कॅप्टन कुणाल कालरा ५) विंग कमांडर जॉय चंद्रा ६) स्क्वाड्रन लीडर सार्थक कुमार ७) स्क्वाड्रन लीडर सिद्धांत सिंग ८) स्क्वाड्रन लीडर रिझवान मलिक ९) फ्लाईट लेफ्टनंट आर्शवीर सिंह ठाकूर.

## संपादकीय

### संघर्षाची मुळे खोलवर

बट्या आणि मानव संघर्षाने नाशिकमध्ये पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात वडनेर गेट येथे चार वर्षांच्या एका अजाण बालकाचा बळी गेला. त्यामुळे पान २ वर

# योगींची स्तुती, पाल यांची समाजवादीतून हकालपट्टी

**पटना ।** उत्तर प्रदेशच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची स्तुती केल्यामुळे नाराज झालेल्या अखिलेश यादव यांनी स्वतःच्या पक्षातील महिला आमदाराची हकालपट्टी केली आहे. योगी आदित्यनाथ यांनी गुन्हेगारीविरोधात कडक पवित्रा घेतल्यामुळेच माझ्यासारख्या अनेक पीडित महिलांना न्याय मिळाला, असे पूजा पाल विधानसभेत म्हणाल्या होत्या. त्यानंतर पक्षविरोधी कृत्य केल्यामुळे पूजा पाल यांना पक्षातून काढून टाकण्यात आले आहे.



आमदार पूजा पाल यांनी स्वतःचे उदाहरण देत प्रयागराजमधील महिलांना योगी आदित्यनाथ यांनी न्याय दिल्याचे सभागृहात म्हटले. योगींमुळेच महिलांना न्याय मिळत असून अतिक अहमदसारख्या गुंडाना धडा शिकवला जात आहे, असे त्या म्हणाल्या. सभागृहात मुख्यमंत्र्यांची तोंडभरून स्तुती केल्यानंतर काही तासांतच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांनी पक्षविरोधी कारवाई केल्याचा आणि शिस्तभंग केल्यामुळे त्यांना पक्षातून हटविण्यात आले आहे.



देशभर १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा केला जात आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला हर घर तिरंगा, घर घर तिरंगा मोहीम राबवली जात आहे. पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिरावर तिरंग्याची विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# गांधींनी नेहरूंना पंतप्रधान करून चूक केली-ठाकरे

**मुंबई ।** भाजपाच्या लोकांचा स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभाग नव्हता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही यांचा सहभाग नव्हता. हे आता आयत्या बिळावर नागोबासारखे बसले आहेत आणि लोकांकडून दूध पाजले जावे, अशी त्यांची अपेक्षा आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी भाजपावर केली. महात्मा गांधी यांनी नेहरूंना पंतप्रधान करून चूकच केली. सरदार वल्लभभाई पंतप्रधान झाले असते तर आज संघ वर दिसलाच नसता.वल्लभभाई पटेल यांनी संघावर बंदी घातली होती. ती बंदीच उठली नसती. मग सांगा नेहरू हवे की, वल्लभभाई पटेल. मग भाजपाकडून पटेल यांचा सर्वात मोठा पुतळा उभारण्यात आला. मध्यंतरी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारणार होते. पण त्यांच्या नातेवाईकांनी विरोध केला.



स्वातंत्र्याच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त, स्वदेशीद्वारे स्वावलंबी भारत निर्माणाची प्रतिज्ञा घ्या.



**आर्थिक स्वातंत्र्य** ऑक्सफॅम ग्लोबल यूके आणि इतर स्त्रोतांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार, १७६५ ते १९०० दरम्यान, परदेशी कंपन्या आणि आक्रमकांनी भारतातून १०० ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम लुटली. आजही, दरवर्षी, परदेशी कंपन्या व्यापाराच्या नावाखाली हजारो आणि लाखो कोटी रुपये परदेशात घेऊन जातात. स्वदेशीच्या माध्यमातून ही लूट थांबवण्याचा आणि भारताला आर्थिक महासत्तेकडे नेण्याचा स्वामीजींचा दृढनिश्चय आहे.

**दानधर्मासाठी समृद्धी:** पतंजलीने आपल्या नफ्यातील १००% भारतमातेच्या सेवेत गुंतवले आहे, गुंतवत आहे आणि पुढेही करत राहील. आज, स्वातंत्र्यदिनी, १००% स्वदेशी स्वीकारण्याचा आणि शहीदांच्या स्वप्नांचा भारत बांधण्याचा संकल्प करा.

**शिक्षणाचे स्वातंत्र्य** १८३५ मध्ये मॅकॉले यांनी स्थापन केलेल्या शिक्षण व्यवस्थेची गुलामगिरी मोडून काढा. तुमच्या शाळांना भारतीय शिक्षण मंडळाशी संलग्न करा. तुमच्या मुलांना फक्त बीएसबीशी संलग्न शाळांमध्येच शिक्षण देण्याचा संकल्प करा. चला आपण सर्वजण एकत्र येऊन दिव्य व्यक्तिमत्व, नेतृत्व आणि चारित्र्याने संपन्न तरुण पिढी घडवूया आणि भारत मातेला शिक्षणाच्या गुलामगिरीतून मुक्त करू या.

**औषध स्वातंत्र्य** ड्रग्ज माफिया आणि मेडिकल माफिया यांचे षड्यंत्र अयशस्वी झाले आहे, सत्याचा अखेर विजय झाला आहे. रोग टिकवून ठेवण्यासाठी कृत्रिम औषधांवर बहिष्कार घाला. योग आणि आयुर्वेदाद्वारे रोगांचे उच्चाटन करण्यासाठी देशभर पसरलेल्या १० हजारांहून अधिक पतंजली केंद्रांवर उपचार घ्या. पतंजलीच्या संशोधन आणि पुराव्यावर आधारित औषधे स्वीकारा. मोफत वैद्यकीय सल्लामसलतीसाठी संपर्क साधा: १८०० २९६ ११११

सर्वोत्तम एकात्मिक उपचारांसाठी पतंजली वेलनेस, योगग्राम, निरामय येथे या. बुकिंगसाठी संपर्क साधा: ८९५४६६६१११, ८९५४६६६२२२ (सकाळी ६ ते रात्री १०)

**वैचारिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य** सनातन धर्माची शाश्वत मूल्ये, आदर्श आणि तत्वे प्रत्येक व्यक्तीची जीवनशैली बनवून सनातन धर्माला युगाचा धर्म म्हणून स्थापित करण्यासाठी पतंजली संस्था आणि संघटनेत सामील व्हा. योगगुरू स्वामी रामदेव जी यांचे कार्यक्रम दररोज सकाळी ५:०० ते ७:३० आणि रात्री ८:०० वाजता आस्था LIVE आणि दररोज सकाळी ७:५६ वाजता INDIA TV चॅनलवर आणि रात्री ९:०० वाजता संस्कार THE CHANNEL OF INDIA पहा.



**डेन्टल केअर** देशातील नंबर १ टूथपेस्ट आणि ताजेपणाचा नवा अवतार, दंत कांती फ्रेश ॲक्टिव्ह जेल.

**हेअर केअर** औषधी वनस्पतींच्या सामर्थ्याने नैसर्गिक पोषण देऊन केस गळणे आणि कोंडा यापासून आराम मिळतो.

**पर्सनल केअर** कोरफड, हळद, गुलाब इत्यादी गुणधर्मांनी त्वचेत नैसर्गिक चमक मिळवा.



**फूड प्रॉडक्ट्स** देशातील नं. १ गायीच्या दुधाचे बिस्किट, निरोगी कुकीज आणि नूडल्स, रिफाइंड पीठ आणि ट्रान्स फॅट फ्री. देशातील नं.१ गायीचे तूप, मोहरी तेल आणि तांदूळ कोंडाचे तेल इ.निरोगी उत्पादने.

**हेल्थ केअर** पतंजलीच्या कोणत्याही औषधावर बंदी नाही. आमची सर्व औषधे पतंजली केंद्रे आणि मुख्य दुकानांमध्ये उपलब्ध आहेत.

**होम केअर** हानिकारक रसायनांपासून बनवलेल्या उत्पादनांवर बहिष्कार घाला. पतंजलीच्या स्वदेशी आणि सात्विक उत्पादनांचा अवलंब करून देशाच्या सेवेत योगदान द्या.